**शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेची नियमावली लागू करण्याबाबत....**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : सीईटी-२०१८/प्र.क्र.२१७/मशि-२,**
मंत्रालय विस्तार, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : ०७ जून, २०१८.

<u>वाचा</u> : १) सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८.
२) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.बी.एड-४६१५/प्र.क्र.२१०/मशि-२, दि.२१ जानेवारी, २०१६.
३) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. सीईटी-२०१५/प्र.क्र. ४४०/मशि-२, दि.२८ जानेवारी, २०१६.
४) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. सीईटी-२०१६/प्र.क्र. ८४/मशि-२, दि.०७ एप्रिल, २०१६.
५) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र.बी.एड४६१६/प्र.क्र.१(भाग-२)/ मशि-२, दि.०५ मे, २०१७.
६) शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. सीईटी-२०१७/प्र.क्र. १२५/मशि-२, दि.१२ मे, २०१७.
७) शासन अधिसूचना, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. सीईटी-२०१६/प्र.क्र.१२८/मशि-२, दि.०२ मे, २०१८.

**<u>प्रस्तावना</u> :-**

संदर्भाधीन क्र.२ येथील दि.२१.०१.२०१६ च्या अधिसूचनेद्वारे शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम (बी.एड, बी.पी.एड, एम.एड, एम.पी.एड) हे व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करुन, सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन संदर्भाधीन क्र.६ येथील दि.१२.०५.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी व अशासकीय अनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शारिरीक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम विहित करण्यात आले होते.

२. संदर्भाधीन क्र.७ येथील दिनांक ०२.०५.२०१८ च्या अधिसूचनेन्वये, संदर्भाधीन क्र.२ येथील दिनांक २१.०१.२०१६ ची अधिसूचना अधिक्रमित करुन, शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम (बी.एड, बी.पी.एड, एम.एड, एम.पी.एड) हे व्यावसायिक अभ्यासक्रम म्हणून घोषित करण्यात येऊन, सदर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व शर्ती विहित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे संदर्भाधीन क्र.६ येथील दि.१२.०५.२०१७ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमित करुन, दिनांक ०२.०५.२०१८ च्या अधिसूचनेनुसार उच्च शिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील

शिक्षणशास्त्र पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी व अशासकीय अनुदानित/ विद्यापीठ विभाग/ विद्यापीठ संचलित संस्थांमधील शारिरीक शिक्षण पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी अर्हता, शर्ती आणि सामायिक प्रवेश परीक्षा व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेचे नियम विहित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून संदर्भाधीन क्र.७ येथील दि.०२.०५.२०१८ रोजीच्या अधिसूचनेद्वारे अधिसूचित केलेल्या शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या (बी.एड, बी.पी.एड, एम.एड, एम.पी.एड) प्रवेशासाठी पात्रतेच्या अटी व आवश्यकता, उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षक प्रशिक्षण विभाग व विद्यापीठ संचलित संस्थामधील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या (बी.एड, बी.पी.एड, एम.एड, एम.पी.एड) प्रवेशासाठी या आदेशान्वये लागू करण्यात येत आहेत.

२. संदर्भाधीन क्र.५ येथील दि.०५.०५.२०१७ रोजीच्या अधिसूचनेतील प्रवेश प्रक्रियेचा, सोबतच्या परिशिष्टामध्ये नमूद बदलांसह अवलंब करुन शासकीय/ अशासकीय अनुदानित/ विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित व राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील शिक्षक प्रशिक्षण विभाग व विद्यापीठ संचलित संस्थांमधील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांचे प्रवेश हे सक्षम प्राधिकारी म्हणून आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष यांच्यामार्फत सामायिक प्रवेश परीक्षेद्वारे व केंद्रीभूत प्रवेश परीक्षेद्वारे एक खिडकी पध्दतीने संदर्भाधीन क्र.३ व ४ येथील अनुक्रमे दि.२८.०१.२०१६ व दि.०७.०४.२०१६ च्या शासन निर्णयान्वये जाहीर केल्याप्रमाणे करण्यात येतील.

३. शासकीय/ अशासकीय अनुदानित/ राज्यातील अकृषि विद्यापीठांमधील व विद्यापीठ संचलित संस्थामधील अनुदानित शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उपलब्ध जागांचे विभाजन सोबतच्या **जोडपत्र-अ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. तसेच विनाअनुदानित/ कायम विनाअनुदानित/ स्वयं अर्थसहाय्यित संस्थेतील शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी उपलब्ध जागांचे विभाजन सोबतच्या **जोडपत्र-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संकेतांक क्रमांक २०१८०६०७१६०७४०९४०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Rohini Bhalekar

Digitally signed by Rohini Bhalekar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Higher And Technical Education Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=440c600559857f4234e969f892346c88247ac81346a1b7229bf9917deb7bce48, cn=Rohini Bhalekar
Date: 2018.06.07 16:11:45 +05'30'

**( रोहिणी भालेकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१. आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, ३०५, शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४९, खेरवाडी, अलियावर जंग मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-५१,
२. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,

३. कुलसचिव, सर्व अकृषि विद्यापीठे, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
४. सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
५. मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
६. मा. राज्यमंत्री (उच्च वतंत्र शिक्षण विभाग) यांचे खाजगी सचिव मंत्रालय, मुंबई,
७. प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई,
८. प्राचार्य, सर्व अशासकीय अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित उच्च महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण यांच्यामार्फत),
९. निवड नस्ती/मशि-२.

# जोडपत्र-अ

## (शासन निर्णय क्रमांक : सीईटी-२०१८/प्र.क्र.२१७/मशि-२, दि.०७ जून २०१८)

Allocation of Seats for admissions to the Professional Undergraduate Degree Courses in Education & Physical Education (B.Ed. & B.P.Ed.) into the Government and Aided Professional Educational Institutions and Aided Undergraduate/ Post-graduate Degree Courses in Education & Physical Education into Non-Agricultural Universities.

| **Sr. No.** | **Type of Institution** | **No. of Seats-as % of Sanctioned Intake** | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | **CAP Seats** | | | |
| | | **Maharashtra State (M.S.) Candidates** | **All India Seats** | **Minority Quota** | **5% Quota for NRI, PIO, Foreign Nationals.** |
| 1. | Government B.Ed. Institution | 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) | 5% ^ | Nil | 5% |
| 2. | Government Aided B.Ed. Institution | **Autonomous** 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) **Non-Autonomous** 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) | 5% ^ | Nil | 5% |
| 3. | Government Aided Minority B.Ed. Institution | **Autonomous*** 40% H.U. Seats **Non-Autonomous** * 40% H.U. Seats | 5% ^ | Minimum 50% @ | 5% |
| 4. | University B.Ed./ M.Ed. Department/ Courses (Government Aided) | 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) | 5% ^ | Nil | 5% |
| 5. | Government Aided B.P.Ed. Institution | **Autonomous** 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) **Non- Autonomous** 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) | 15%^ | Nil | 5% |
| 6. | GovernmentAided Minority B.P.Ed. Institution | **Autonomous*** 30% H.U. **Non-Autonomous*** 30 % H.U. | 15%^ | Minimum 50%@ | 5% |
| 7. | University B.P.Ed./ M.P.Ed. Department/Courses (Government Aided) | 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) | 15%^ | Nil | 5% |

CAP Seats = Sanctioned Intake

$ M.S. Seats = CAP Seats – (All India Seats + Minority Quota)

* The seats excluding the Minority Quota and shall be filled in the stipulated percentage from the Maharashtra Candidature Candidate.

@ These are the minimum percentage of seats to be filled in the Minority Institution through CAP, this may be extended up to 100%. However before commencement of the CAP, such Institution shall declare and inform to the Competent Authority, the maximum percentage of minority quota to be filled in their institution.

^ One seat reserved for Jammu and Kashmir Migrant Candidates. This seat shall be filled by the Competent Authority as per the policy of the Government. If the seat remains vacant, it shall be filled through All India Candidature candidate.

H.U. – Home University.

O.H.U. – Outside Home University.

********

# जोडपत्र-ब

## (शासन निर्णय क्रमांक : सीईटी-२०१८/प्र.क्र.२१७/मशि-२, दि.०७ जून, २०१८)

Allocation of Seats for admissions to the Professional Undergraduate/Post-graduate Degree Courses in Education & Physical Education (B.Ed., M.Ed., B.P.Ed., M.P.Ed.) into the Unaided (Vina-Anudanit) Professional Educational Institutions and Unaided/Self-Financed Undergraduate/ Post-graduate Degree Courses in Education & Physical Education into Non- Agricultural Universities.

| Sr. No. | Type of Institution | No. of Seats-as % of Sanctioned Intake | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | CAP Seats | | | |
| | | **Maharashtra State (M.S.) Candidates** | **All India Seats** | **Minority Quota** | **Quota for NRI, PIO, Foreign Nationals.** |
| 1. | Unaided (Vina-anudanit) B.Ed. Institution | **Autonomous** – 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) **Non-Autonomous-** 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) | 5% ^ | Nil | 5% |
| 2. | Unaided (Vina-anudanit) Minority B.Ed. Institution | **Autonomous*** 39% H.U. Seats **Non-Autonomous** * 39% H.U. Seats | 5% ^ | 51% @ | 5% |
| 3 | Unaided (Vina-anudanit) B.P.Ed. Institution | **Autonomous** – 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) **Non- Autonomous-** 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) | 15% ^ | Nil | 5% |
| 4 | Unaided (Vina-anudanit) Minority B.P.Ed. Institution | **Autonomous*** 29% H.U. **Non-Autonomous*** 29 % H.U. | 15% ^ | 51% @ | 5% |
| 5 | Unaided/ Self-Financed B.Ed. / M.Ed. Courses run by University | 90% M.S. Seats $ (70% H.U., 20% O.H.U.) | 5% ^ | Nil | 5% |
| 6 | Unaided/ Self-Financed B.P.Ed./ M.P.Ed. Courses run by university | 80% M.S. Seats $ (60% H.U., 20% O.H.U.) | 15%^ | Nil | 5% |

CAP Seats = Sanctioned Intake

$ M.S. Seats = CAP Seats – (All India Seats + Minority Quota)

* The seats excluding the Minority Quota and shall be filled in the stipulated percentage from the Maharashtra Candidature Candidate and All India Candidature Candidate.

@ These are the minimum percentage of seats to be filled in the Minority Institution through CAP, this may be extended up to 100%. However before commencement of the CAP, such Institution shall declare and inform to the Competent Authority, the maximum percentage of minority quota to be filled in their Institution.

^ One seat reserved for Jammu and Kashmir Migrant Candidates. This seat shall be filled by the Competent Authority as per the policy of the Government. If the seat remains vacant, it shall be filled through All India Candidature candidate.

H.U. – Home University.

O.H.U. – Outside Home University.

*********